<u>**विशेष दिवाणी दावा क्र.०१/२०२३**</u>

## <u>निशाणी क्र.४२३ वरील आदेश</u>

( बन्सी घाडगे वि. महाराष्ट्र शासन वगैरे )

प्रस्तुतचा अर्ज वादीने दाखल केला असून दाव्यातील प्रतिवादी क्र.७(अ) तथा प्रतिवादी क्र.१३ श्रीमती नागरबाई हे दिनांक २४.१०.२०२३ रोजी मयत झालेले आहेत. सदर प्रतिवादी क्र.७(अ) तथा प्रतिवादी क्र.१३ चे विरुध्द अबेटमेंट आदेश रद्द होऊन मिळणेबाबत विनंती केली आहे.

<u>अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की</u>,

२. प्रतिवादी क्र.७(अ) तथा प्रतिवादी क्र.१३ नागरबाई हे दिनांक २४.१०.२०२३ रोजी मयत झालेले आहेत. सदर बाब वादीस अलीकडेच समजली. त्यामुळे मुदतीत वारस रेकॉर्डवर आणणेचा अर्ज देता आला नाही. आजरोजी वादीने वारस रेकॉर्डवर वेगळा अर्ज दाखल केला आहे. वादीने जाणून बुजून विलंब केला नाही. प्रतिवादी क्र.७(अ) तथा प्रतिवादी क्र.१३ बाबत प्रस्तुतचा दावा उपशम झालेला आहे व तो आदेश रद्द करुन मिळणेची विनंती केली.

३. सदर अर्जावर प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे सादर करुन नमूद केले आहे की, प्रस्तुत अर्जामध्ये नमूद केलेले विलंबा बाबतचे कारण संयुक्तीक स्वरुपाचे नसल्याने अर्ज रद्द करावा. अर्ज मंजूर केल्यास वादीस कॉस्ट करण्यात यावी.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेख पाहिले असता प्रतिवादी क्र.७(अ) तथा प्रतिवादी क्र.१३ नागरबाई घाडगे हे दिनांक २४.१०.२०२३ रोजी मयत झाले बाबत मृत्यु प्रमाणपत्र दाखल केले आहे. कायद्याप्रमाणे एखादया व्यक्तीचे मृत्युनंतर त्याचे वारस दाव्यात पक्षकार म्हणून ९० दिवसांचे आत अभिलेखावर आणणे गरजेचे आहे. परंतु तसे न झाल्यास संबंधीत मयत व्यक्तीविरुध्द दावा उपशम होतो असे समजले जाते. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी

क्र.७(अ) तथा प्रतिवादी क्र.१३ हे दिनांक २४.१०.२०२३ रोजी मयत झाल्यामुळे तेथून पुढे ९० दिवसांच्या आत त्यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे होते. परंतु वादींनी विहीत मुदतीत प्रतिवादी क्र.७(अ) तथा प्रतिवादी क्र.१३ यांचे वारस अभिलेखावर घेतले नाहीत. त्यामुळे त्यांच्या विरुध्द उपशम आदेश झाला असे समजले जाईल. वादीस प्रतिवादी क्र.७(अ) तथा प्रतिवादी क्र.१३ चे कायदेशीर वारस अभिलेखावर आणणे न्यायाचे दृष्टीने अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करणे क्रमप्राप्त ठरेल. वरील सर्व बाबींचा विचार करुन खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. वादी यांचा अर्ज खालील आदेशाच्या अटीच्या पुर्ततेनंतर मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांना आदेशीत करण्यात येते की त्यांनी खर्च रुपये १०० हे प्रतिवादीस द्यावे. वादी यांनी खर्च रक्कम रुपये १००/- दिले नंतर प्रतिवादी क्र.७(अ) तथा प्रतिवादी क्र.१३ यांचे विरुध्द झालेला उपशम (abatement) आदेश रद्द समजण्यात यावा.

SANJAY MOTIRAM GHUGE
Digitally signed by SANJAY MOTIRAM GHUGE
Date: 2026.01.12 11:52:58 +0530

स्थळ – करमाळा
दिनांक – ०९.०१.२०२६

( संजय मो. घुगे )
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, करमाळा

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of the this P. D. F. file Order/Judgment are same word to word, as per the original order/ judgment

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | B.R.Kondekar |
| Court Name | : | Civil Court Senior Division, Karmala |
| Date | | 09.01.2026 |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 09.01.2026 |
| Order uploaded on | : | 09.01.2026 |